महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,निर्णय क्रमांक- वाहन -२०२३/ प्र. क्र.२१/ सेवा-५ दि.२६/०९/२०२५

**विषय :-** शासकीय कर्तव्यस्थानापासून एक कि.मी. अंतराच्या आत वा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवास्थानात वास्तव्य करणा-या पात्र दिव्यांग कर्मचा-यांना वाहतूक भत्ता सुधारीत दराने मंजूर करण्याबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक वाहन -२०२३/ प्र. क्र .२१/ सेवा-५, दि.२६ /०९ / २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९२६१६४०४०१२०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 07-10-2025 00:09:37

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

शासकीय कर्तव्यस्थानापासून एक कि.मी. अंतराच्या आत वा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवासस्थानात वास्तव्य करणाऱ्या पात्र दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सुधारीत दराने मंजूर करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन निर्णय क्रमांक:- वाहन-२०२३/प्र.क्र.२१/सेवा-५**
मंत्रालय,मुबंई-४०००३२
दिनांक:-२६ सप्टेंबर, २०२५

**वाचा:-**

१. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५,दिनांक ०५ एप्रिल,२०१०
२. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५,दिनांक ०७ सप्टेंबर, २०११
३. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५,दिनांक ०३ जून,२०१४
४. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५,दिनांक १० ऑगस्ट,२०१५
५. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२०२१/प्र.क्र.२८/सेवा-५,दिनांक ०३ एप्रिल,२०१७
६. शासन पूरकपत्र,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५,दिनांक १८ एप्रिल,२०१७
७. केंद्र शासन,सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय, दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग यांची अधिसूचना क्र. एस.ओ. १२१५ (ई), दिनांक १९ एप्रिल,२०१७
८. केंद्र शासन,वित्त मंत्रालय,व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.२१/५/२०१७-ई-॥ (बी), दिनांक ०७ जुलै,२०१७
९. शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक वाहन-२०२०/प्र.क्र.०३/२०२०/सेवा-५,दिनांक २० एप्रिल,२०२२
१०. केंद्र शासन,वित्त मंत्रालय,व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.२१/१/२०१८-ई-॥ (बी), दिनांक १५ सप्टेंबर,२०२२

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने अ.क्र.१० येथील दिनांक १५ सप्टेंबर,२०२२ च्या ज्ञापनान्वये केंद्र शासकीय दिव्यांग कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय वाहतूक भत्त्याच्या अनुषंगाने प्रचलित सर्व सूचनांचे एकत्रिकरण करून सुधारीत आदेश निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या धर्तीवर कर्तव्यस्थानाच्या एक किलोमीटर अंतराच्या आत वा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता सुधारीत दराने अनुज्ञेय करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांचे वरील अ. क्र. ९ येथील वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२२ मधील तक्ता क्र.१ व २ ( अंध, अस्थिव्यंगाने अधू आणि कण्याच्या

विकाराने पिडीत असणाऱ्या तसेच मूकबधीर/ श्रवणशक्तीतील दोष असणाऱ्या दिव्यांग कर्मचारी ) नुसार वाहतूक भत्त्याचे दर दिनांक ०१/०४/२०२२ पासून सुधारित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ मधील नियमांच्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार दिव्यांगजनांच्या पूर्वीच्या ७ प्रवर्गाव्यतिरिक्त १४ अन्य प्रवर्गांचा समावेश केला असून त्यानुसार २१ दिव्यांग प्रवर्ग खालीलप्रमाणे आहेत:-

१. Blindness-( पूर्णत: अंध )

२. Low-vision ( अंशत: अंध )

३. Leprosy cured ( कुष्ठरोग निवारित/मुक्त )

४. Hearing Impairment( deaf & hard of hearing ) ( कर्णबधिर/ऐकू कमी येणे )

५. Locomotor Disability-( अस्थिव्यंग )

६. Intellectual disability-( बौध्दीक अक्षम )

७. Mental Illness ( मानसिक वर्तन/मानसिक आजार )

<u>दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये नव्याने समाविष्ट १४ दिव्यांग प्रवर्ग</u>

८. Cerebral Palsy- ( मेंदुचा पक्षाघात )

९. Dwarfism- ( शारिरीक वाढ खुंटणे )

१०.Autism Spectrum disorder- ( स्वमग्न )

११.Muscular Dystrophy and Spinal Deformity ( स्नायुंची विकृती व पाठीचा कणा विकृती )

१२.Chronic Neurological condition- ( मज्जासंस्थेचे तीव्र आजार )

१३. Specific Learning Disabilities- (विशिष्ट अध्ययन अक्षम)

१४. Multiple Sclerosis-( हातापायातील स्नायू कमजोर/शिथिल होणे )

१५. Speech & Language Disability-( वाचा व भाषा दोष )

१६. Thalassemia-( रक्तातील कमतरता )

१७. Haemophilla-( अधिक रक्तस्राव )

१८. Sickle cell disease-( रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे )

१९. Multiple Disabilities ( बहुविकलांग )

२०. Acid Attack victims-( आम्ल हल्ला पिडित )

२१. Parkinson`s disease-( कंपवात )

वरील दिव्यांगत्वाच्या प्रवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार विहित केलेल्या सक्षम प्राधिकारी यांचेकडून अपंगत्वाचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. राज्य शासनाच्या दिव्यांगत्वाच्या प्रवर्गाच्या यादीत वरील प्रवर्गांचा समावेश करण्यात येत आहे.

२. राज्य शासनाच्या वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २० एप्रिल,२०२२ च्या परिच्छेद २ च्या (एक) मधील तरतूदीनुसार कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवासस्थान पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना वाहतुक भत्ता अनुज्ञेय असणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. तथापि राज्य शासनाने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १४/१२/१९९८ अन्वये व म.ना.से.(सुधारीत वेतन) नियम, २००९ अन्वये सुधारीत वेतनसंरचना लागू केल्याच्या अनुषंगाने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ५/०४/२०१० अन्वये वाहतूक भत्त्याचे दर सुधारीत केल्यानंतर वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ७/०९/२०११ अन्वये कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांचा एकत्र परिसरात शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असेल अशा दिव्यांग कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण दराने वाहतूक भत्ता, सदर आदेशातील अन्य अटींच्या अधीन राहून, अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

वित्त विभाग, दिनांक २० एप्रिल,२०२२ च्या शासन निर्णयान्वये वाहतूक भत्त्याचे दर सुधारीत करताना अ.क्र.१ येथील दिनांक ०५/०४/२०१० चा शासन निर्णय व दि ०७/०९/२०११ चे शासन शुध्दिपत्रक अधिक्रमित केलेले नाही. सदर शुध्दिपत्रकातील तरतूदीनुसार कर्तव्यस्थानापासून एक किलोमिटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात आलेला आहे ही तरतूद वित्त विभाग, दिनांक २० एप्रिल,२०२२ च्या शासन निर्णयानंतरही लागू आहे. त्यामुळे दिनांक २० एप्रिल,२०२२ नंतरही दिव्यांग कर्मचाऱ्यांना कर्तव्यस्थानापासून एक कि.मी. अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांचा एकत्र परिसरात शासकीय निवासस्थानात वास्तव्य असेल तर पूर्वीप्रमाणेच सर्वसाधारण दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय आहे.

३ सद्यस्थितीत, केंद्र शासनाच्या वरील अ.क्र. १० येथील दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ च्या ज्ञापनातील परिच्छेद ५ मधील ५.४ नुसार केंद्र शासनातील पात्र दिव्यांग कर्मचारी कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटरच्या अंतराच्या आत शासकीय / खाजगी निवासस्थानात राहत असेल किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकीय निवासस्थानात वास्तव्यास असेल तरीही त्यांना सर्वसाधारण दराच्या दुप्पट दराने वाहतुक भत्ता अनुज्ञेय राहील अशी तरतुद केली आहे. सदर तरतूदीस अनुसरून राज्य शासनातील व इतर पात्र दिव्यांग कर्मचारी कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटरच्या अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान आणि निवासस्थान यांच्या एकत्र परिसरात शासकिय निवासस्थानात वास्तव्यास असतील त्यांना वित्त विभाग, दिनांक २० एप्रिल,२०२२ च्या शासन निर्णयान्वये तक्ता २ व त्याखालील तरतूदीनुसार अनुज्ञेय केलेल्या दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय राहील. सदर तरतूद या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

४. तसेच वाहतूक भत्याचे प्रदान करण्यासंदर्भात इतर विद्यमान तरतूदी, अटी, शर्ती व कार्यपध्दती आहे त्याचप्रकारे लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९२६१६४०४०१२०५ असा आहे. सदर शासन निर्णय डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MUGDHA NITIN DHURI

Digitally signed by MUGDHA NITIN DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Finance Dept, 2.5.4.20=CF57B0402DF957A7D20B051925B771CB1D70227A5D6A66673B7656596A962B41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43B82982D7CE8CB63F33F9D9AE085C7E452884CA6ED53708069BD26F9BE61D71, cn=MUGDHA NITIN DHURI
Date: 2025.09.26 16:42:51 +05'30'

**(मुग्धा नि. धुरी)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>उपमुख्यमंत्री यांचे सचिव<br>सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई<br>सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई<br>सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.<br>सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई.<br>सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.<br>प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br>मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई<br>आयुक्त, राज्य माहिती आयोग,(सर्व)<br>सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई.<br>प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे<br>सर्व विभागीय आयुक्त. | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.<br>संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,<br>विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.<br>बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १<br>भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३<br>इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५<br>नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१<br>शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ |

| | |
|---|---|
| सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई,<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर. | वित्त विभागातील सर्व कार्यासने<br>निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-५) |